## निशाणी कमांक ७ वरील आदेश

१. निशाणी ७ वरील अर्ज वादीने तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दावा हा कायमच्या मनाई हुकूमासाठी आहे.

२. दाव्यातील मजकूर थोडक्यात असा की,

मौजे धांदरणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील शेत गट कमांक १६१/३ क्षेत्रफळ ० हेक्टर ६८ आर यासी पूर्वेस गट कमांक १६१/७, पश्चिमेस गट कमांक १६१/६, दक्षिणेस गट कमांक १६१/२, उत्तरेस गट कमांक १६१/४ ही जमीन वादींच्या मालकीची व कब्जे उपभोगातील आहे. सदरची जमीन ही वादी कमांक १ चे पती व इतर वादींचे वडील राजेंद्र उर्फ राजेश कृष्णा शिंपी यांच्या मालकीची होती. ते दिनांक २१/११/२०१३ रोजी मयत झाले. सदर शेत हे राजेश कृष्णा यांना वाटणीत मिळालेले आहे. गट कमांक १६१ ही अखंड होती. शेताची वाटणी राजेश कृष्णा शिंपी, त्याचे भाउ व आई यांच्यात फेरफार नोंद कमांक १७९२ नुसार झालेली आहे. त्याप्रमाणे गट कमांक १६१/३ हा राजेंद्र याच्या हिस्स्याला आलेला आहे. गट कमांक १६१/१ या शेतात पूर्वीपासून विहीर असून ती सामाईक मालकीची आहे. त्यातून पाणी घेण्याचा हक्क वादीस फेरफार नोंद कमांक १६४८ नुसार मिळालेला आहे. राजेंद्र कृष्णा हे मूळ होळ गावाचा रहिवासी असून ते व्यवसायासाठी नालासोपारा, ता. वसई जि ठाणे येथे राहत होते. वाद मिळकत ही वादींच्या ताब्यात कायदेशीरपणे सतत आहे. राजेंद्र शिंपी यांचे निधन झाले तेव्हापासून प्रतिवादी कमांक १ ते ६ यांनी वादीच्या शांततामय ताब्यास हरकत करणे सुरू केले. दिनांक ०७/०३/२०१४ रोजी प्रतिवादींनी वादीला धमकी दिली. म्हणून वादीने सदरचा दावा दाखल केला आहे व त्यात निशाणी ७ चा अर्ज दाखल

केला आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी क्रमांक १७ वर खुलासा दाखल केला आहे. त्यांनी दाव्यातील मजकूर नाकारला. त्यांनी नातेसंबंध व वाद मिळकतीच्या चतुःसिमा नाकारल्या. दाव्यात जमुनाबाई कृष्णा शिंपी व तिच्या मुलींना समाविष्ट केलेले नाही. वादीने न्यायालयात वारसा दाखला अर्ज क्रमांक ७/२०१४ दाखल केलेला आहे. सदरची बाब ही वादीने लपवलेली आहे. वाद मिळकत ही जमुनाबाई कृष्णा शिंपी व प्रतिवादी यांच्या ताब्यात आहे. ते दाव्यात पिक घेत आहेत. त्यांनी वाद मिळकतीचे सपाटीकरण केलेले आहे. सबब वादीचा दावा नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

४. वादी व प्रतिवादीतर्फे दाखल लेखी कथन व दस्तऐवज यावरून खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी तपशीलवार कारणांसहीत निष्कर्ष नोंदवीत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी वादी लाभात सदरचा अर्ज आहे काय? ..... | **होय** |
| २. | जर मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल काय?....... | **होय** |
| ३. | वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे काय?... | **होय** |
| ४. | आदेश? | **..अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**सर्व मुद्दयांकरीता:-**

५. मुद्दे कमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यावर मी एकत्रित विवेचन करीत आहे. वादीतर्फे अधीवक्ता श्री. व्ही. ए. जाधव व प्रतिवादीतर्फे अधीवक्ता श्री. बी. झेड मराठे यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, राजेंद्र कृष्णा शिंपी व राजेश कृष्णा शिंपी हे एकच व्यक्ती आहेत. वादी कमांक १ ही त्याची पत्नी असून इतर वादी त्यांची अपत्ये आहेत. तसेच वाद मिळकत ही वादींच्या ताब्यात आहे. त्यासाठी त्यांनी सातबारा उतारे, पिकपेरा नोंदी, हक्क पत्रकाच्या नोंदी दाखल केलेल्या आहेत. त्या सर्वात राजेंद्र कृष्णा शिंपी याचे नाव मालक व कब्जेदार म्हणून सन १९९३ पासून ते सन २०१४पर्यंत दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादीने सिध्द करावे की, राजेश व राजेंद्र हे दोन वेगवेगळे व्यक्ती आहेत. प्रतिवादींनी सिध्द करावे की, वादी ही त्याची पत्नी नाही व इतर वादी या त्याच्या मुली नाही. त्यासाठी वादीने अनेक लग्नपत्रिका, रेशन कार्ड, मतदार पत्रिका, आधार कार्ड, शाळेचे दाखले, जन्मपत्रिका, पॅनकार्ड इत्यादी दस्तऐवज तसेच मयत राजेंद्र उर्फ राजेश शिंपी यांचे शपथपत्र सोबत दोन साक्षीदारांचे शपथपत्र दाखल केलेले आहेत. प्रतिवादीने कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. प्रतिवादींतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, राजेंद्र कृष्णा शिंपी व राजेश शिंपी यांचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे वादीशी ही त्यांचा कोणताही संबंध नाही. वादीने सिध्द करावे की, ती राजेंद्र कृष्णा शिंपी यांची पत्नी आहे. वादीतर्फे दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजात राजेश कृष्णा असे नाव लिहीलेले आहे. शपथपत्रातही राजेश कृष्णा शिंपी असे नाव लिहीलेले आहे. त्यामुळे तो व्यक्ती वेगळा असून वादी हे बेकायदेशीररित्या प्रतिवादींच्या मिळकतीवर ताबा करण्याच्या

विचारात आहे. हिंदु वारसा कायदयानुसार राजेंद्र कृष्णा शिंपी मरण पावल्यावर त्याची आई जमुनाबाई कृष्णा शिंपी ही सुध्दा वारस आहे. त्यामुळे तिला प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे आवश्यक होते. सबब सदरच अर्ज नांमजूर करण्यात यावा.

६. वादीतर्फे निशाणी ३ सोबत अनेक दस्तऐवज दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच त्यानंतर पुन्हा निशाणी कमांक २६ सोबत एकूण २३ दस्तऐवज दाखल करण्यात आलेले आहेत. वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या सातबारा उता-यावर मालक व पिकपेरा सदरी राजेंद्र कृष्णा शिंपी याचे नाव लिहीलेले आहे. फेरफार नोंद कमांक १७९२ नुसार गट कमांक १६१/३ हा वाटणीने राजेंद्र कृष्णा शिंपी यास देण्यात आलेला आहे. फेरफार नोंद कमांक १६४८ नुसार कृष्णा गिरधर शिंपी यांच्या मुलाचे नाव राजेंद्र कृष्णा शिंपी म्हणून दाखविण्यात आलेले आहे. तसेच इतर दस्तऐवजांवरून राजेश कृष्णा शिंपी असे नाव लिहील्याचे दिसून येते. गट कमांक १६१/१ या उता-यावरही राजेंद्र कृष्णा शिंपी असे नाव नमूद करण्यात आलेले आहे. राजेश कृष्णा शिंपी, रा. नालासोपारा याचे दिवाणी न्यायालय वसई येथील प्रतिज्ञापत्र पाहिले असता त्यात नमूद केले आहे की, त्याची पत्नी ही घरीच असून पाच मुली शिक्षण घेत आहेत. तो भाडयाची रिक्षा चालवितो. त्या रिक्षाशिवाय त्याच्याकडे उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्याचे वार्षिक उत्पन्न फक्त रू.९६००/- आहे. त्याला नगरपालिकेकडून कर्ज घ्यावयाचे आहे. म्हणून त्याने शपथपत्र करून दिलेले आहे. त्यावरून स्पष्ट होते की, राजेश कृष्णा शिंपी हा कायमस्वरूपी नालासोपारा येथील रहिवासी असून तो फक्त भाडयाची रिक्षा चालवित होता. त्याच्याकडे इतर कोणतीही मिळकत नाही. त्याला शेतीपासून उत्पन्न नाही. शिधापत्रिका पाहिली असता त्यातही राजेश कृष्णा असे नाव नमूद करण्यात आलेले

आहे. वादीने काही लग्नपत्रिका दाखल केलेल्या आहेत. त्यात राजेंद्र कृष्णा व त्याची पत्नी राजेश्री राजेंद्र काही पत्रिकेत राजेश कृष्णा व राजश्री राजेश असे नावे नमूद केलेली आहेत. शाळेच्या दाखल्यात राजेश कृष्णा शिंपी असे नाव नमूद केलेले आहे. क्षत्रिय अहिर शिंपी समाजाची वंशावळी पाहिली असता त्यात कृष्णाशेठ यास राजेंद्र शेठ नावाचा मुलगा असल्याचे दर्शविलेले असून त्याची पत्नी राजश्रीबाई यांचा आंतरजातीय विवाह (मराठासमाज ) असे नमूद केलेले आहे. परंतु वरील संपूर्ण दस्तऐवजात राजेंद्र शिंपी व राजेश शिंपी हे एकच व्यक्ती आहेत असे कुठेही दिसून येत नाही. वादीने सोबत काही फोटो दाखल केलेले आहेत. परंतु त्यावरूनही राजेश व राजेंद्र शिंपी हे एकच व्यक्ती आहेत असे निष्पन्न होत नाही.

७. वादीतर्फे उत्तम दत्तात्रय शिंपी व दिलीप रतन पाटील यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यात नमूद केलेले आहे की, राजेंद्र कृष्णा शिंपी याची राजश्री ही पत्नी आहे. तसेच त्यांना वादी कमांक २ ते ६ या मुली आहेत. राजेंद्र शिंपी हे होळ गावचे रहिवाशी होते. ते नालासोपारा येथे त्यांच्या परिवारासह राहत होते. ते मयत झाल्यानंतर त्यांची प्रेतयात्रा, दशक्रिया विधी होळ येथे प्रतिवादी कमांक २ नारायण शिंपी याच्या घरी पार पडली. शेत गट कमांक १६१/३ ही मयत राजेंद्र कृष्णा शिंपी यांच्या मालकीची असून त्यानंतर त्यांची पत्नी ही ती शेत मिळकत खेडीत आहे. परंतु वादीतर्फे दाखल केलेल्या सातबारा उता-यावरून राजेंद्र शिंपी हे दिनांक २१/११/२०१३ रोजी मयत झाल्यानंतर वादी ही ती शेत मिळकत खेडत आहे याबद्दल कोणतेही उतारे न्यायालयात दाखल केलेले नाहीत. परंतु वादी कमांक १ हीने न्यायालयात वारसा दाखला अर्ज कमांक ७/२०१४ दाखल केलेला आहे. त्यात जमनाबाई कृष्णा शिंपी ही हजर झालेली

आहे. हिंदु वारसा कायदयानुसार राजेंद्र शिंपी याच्या मृत्युनंतर त्याची आई ही सुध्दा वारस आहे.

८. प्रतिवादींनी वाद मिळकत ही त्यांच्या ताब्यात आहे हे दाखविण्यासाठी कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाही. परंतु वादीने दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजांवरून स्पष्टपणे दिसून येते की, वाद मिळकत ही राजेंद्र कृष्णा शिंपी हे खेडत होते. राजेंद्र कृष्णा शिंपी यांनी आंतरजातीय विवाह केल्यामुळे ते पुढील व्यवसायासाठी नालासोपारा येथे राहवयास गेले. त्या ठिकाणी ते रिक्षा चालवित होते. सातबारा उता-यांना महाराष्ट जमीन महसूल अधिनियम कलम १५७ प्रमाणे गृहीतक असून ते प्रतिवादीने खोडून काढलेले नाही. वादीने दाखल केलेल्या प्रतिवादींच्या नातेवाईकांच्या लग्नपत्रिकेतही वादी कमांक १ चे नाव राजेंद्र उर्फ राजेश शिंपी यांची पत्नी म्हणून दर्शविलेले आहे. फक्त नावात फरक असल्यामुळे वादींचा हक्क डावलता येणार नाही. राजेंद्र उर्फ राजेश शिंपी हे मयत झाल्यानंतर वाद मिळकत वादी कमांक १ ही खेडत आहे त्याबद्दल वादीने दोन लोकांचे शपथपत्र दिलेले आहे. तसेच वादीने सन १९९३ ते २०१४ चे सातबारा उतारे दाखल केलेले आहेत. त्यावर राजेंद्र कृष्णा शिंपी याचा सतत अव्याहत ताबा मालक म्हणून दिसत आहे. वादीने गट कमांक १६१ पैकी इतर हिस्स्यांचेही उतारे दाखल केलेले आहेत. त्यानुसार वादीचे पती व त्याचे भाउ यांच्यात वाटणी झाल्याचे निष्पन्न होते. फेरफार नोंदीनुसार गट कमांक १६१/1 मधून विहीरीतून वादींना पाणी घेण्याचा हक्क आहे. प्रतिवादीने कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीत वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे हे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. उलट प्रतिवादी हे नावात असलेला फरक लक्षात घेवून त्यांचा गैरफायदा

घेवून वादींना त्यांच्या मिळकतीपासून डावलण्याच्या मागे आहेत. त्यामुळे जर मनाई हुकूम दिला नाही तर वादींचे नुकसान होणार आहे. मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सर्व दस्तऐवज लक्षात घेतले असता न्यायाचा समतोल हा सुध्दा वादींच्या बाजूने आहे. राजेश व राजेंद्र हा एक व्यक्ती नाही व वादी कमांक १ ही त्याची पत्नी नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादींवर आहे. त्यामुळे वरील तिन्ही घटक आजच्या क्षणी वादीने सिध्द केलेले आहेत. सध्या वाद मिळकतीवर ताबा वादीचा आहे. त्यामुळे मी तिन्ही मुद्दयांचे उत्तरे होकारार्थी नोंदवित असून निशाणी ५ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः-

## आदेश

१. निशाणी कमांक ५ वरील अर्ज मंजूर करीत आहे.

२. प्रतिवादी अगर त्याच्यातर्फे अन्य कोणीही प्रतिनिधी किंवा नातेवाईक यांनी वादीस वाद मिळकत खेडण्यापासून व त्यांच्या शांततामय कब्जास हरकत अडथळा पुढील आदेश होईपावेतो करू नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम देण्यात येत आहे.

सही/-

दिनांकः-०५/०३/२०१५

(म.सु.अग्रवाल)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिंदखेडा

## प्रमाणपत्र

मी प्रमाणीत करीतो की, सदर पी. डी. एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | हिरामण आनंदा रामोळे |
| न्यायालयाचे नाव | :- | दिवाणी न्यायालय क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, शिंदखेडा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०५/०३/२०१५ |

स्वाक्षरीत/-
(एच.ए.रामोळे)
लघुलेखक(नि.श्रे.)